स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रा.डॉ. गणेश भामे
एम्.ए., पीएच्.डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

**रासेयो/२०२६–२७/२६४** **दि. २९/०९/२०२६**

**प्रति,**
**मा. प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था**
**पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्हा**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

**विषय : ‘सृजनरंग’ सांस्कृतिक व साहित्यिक स्पर्धा जिल्हानिहाय व विद्यापीठस्तरावर आयोजन करणेबाबत (सन २६–२७)**

महोदय/महोदया,

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी **‘सृजनरंग’ सांस्कृतिक व साहित्यिक स्पर्धांचे** आयोजन करण्यात आले आहे. त्यानुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने स्वरचित काव्यलेखन व वाचन स्पर्धा, निबंध, वक्तृत्त्व, भित्तीचित्र, पोवाडागायन व पथनाट्य या स्पर्धांचे जिल्हा व विद्यापीठस्तरावर आयोजन करण्यात आले आहे.

पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्हा आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ याठिकाणी पुढील तपशिलानुसार स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे. वरीलप्रमाणे कलाप्रकारात नैपूण्य असलेल्या आपल्या महाविद्यालयातील स्वयंसेवकांची महाविद्यालय स्तरावर स्पर्धा आयोजित करून प्रथम तिन क्रमांक प्राप्त स्पर्धकास जिल्हास्तरीय स्पर्धेकरिता जिल्हानिहाय आयोजक महाविद्यालयांमध्ये पाठविणे आवश्यक आहे. जिल्हानिहाय स्पर्धेतील प्रत्येक कलाप्रकारातील प्रथम तीन क्रमांकास **दि. १६ ऑक्टोबर, २०२६** रोजी विद्यापीठस्तरावरील स्पर्धेत सहभागी होणे अनिवार्य आहे. संपूर्ण स्पर्धेची अधिक तपशीलवार माहिती पुढीलप्रमाणे.

**निबंध, वक्तृत्त्व, पथनाट्य, पोवाडागायन, भित्तीचित्र, स्वरचित काव्यलेखन व वाचन स्पर्धा विषय, संघ व इतर माहिती**

| क्र. | स्पर्धा | विषय | नियमावली |
|---|---|---|---|
| १ | काव्यवाचन | कवितेचा विषय सामाजिक आशयाचा असावा. (कविता स्वरचित असावी. सादरीकरण करण्यापूर्वी एक प्रत आयोजकांकडे जमा करण्यात यावी.) | **कविता** : स्वरचित असावी<br>**वेळ** : ३+२ मिनीट,<br>**भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी |
| २ | निबंध | १. नशामुक्त भारत : युवकांची जबाबदारी<br>२. महात्मा फुले : शिक्षणातुन सामाजिक क्रांतीचा मार्ग<br>३. जल, जमीन आणि जंगल : शाश्वत विकासाची त्रिसुत्री<br>४. विकसित भारत २०४७ : युवकांची भुमिका आणि जबाबदारी<br>५. संत साहित्याची सामाजिक फलवृत्ती | **शब्द मर्यादा** : १००० शब्द,<br>**भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी,<br>**वेळ** : लेखनासाठी २ तास |
| ३ | वक्तृत्त्व | १. नशामुक्त भारत : युवा शक्तीचा संकल्प<br>२. सामाजिक परिवर्तनात मराठी साहित्याची भुमिका<br>३. क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले<br>४. विकसित भारत २०४७ : युवकांची भुमिका आणि जबाबदारी | **भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी,<br>**वेळ** : ४ मिनीट+१ मिनीट |
| ४ | भित्तीचित्र | नशामुक्ती, अवयवदान, ध्वनी प्रदुषण, निसर्ग वाचवा देशव वाचवा, वन्यजीव संवर्धन | **वेळ** : २ तास, **साहित्य** : फक्त कागद आयोजकांमार्फत देण्यात येईल. रंग व इतर आवश्यक साहित्य घेऊन यावे. |
| ५ | पोवाडा गायन | सामाजिक समस्यांवर आधारित पोवाडा गायन (उदा. नशामुक्ती, महापुरूषांचे विचार, स्वच्छता अभियान, लोकसंख्या वाढ यांसह इतर सामाजिक विषय) | **वेळ** : ३+२ मिनीट,<br>**संघ** : १+२ साथीदार |
| ६ | पथनाट्य | मतदार नोंदणी व जागृती (एसआरआय), नशामुक्ती युवक, लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी, रस्ता सुरक्षा माझी जबाबदारी | **वेळ** : ८+२ मिनीट,<br>**संघ** : ८+१ विद्यार्थी |

वरीलप्रमाणे स्पर्धांचे जिल्हानिहाय पद्धतीने आयोजन करताना पुढील वेळापत्रकानुसार कार्यवाही करण्यात यावी व त्याबाबत विद्यार्थ्यांना सूचित करण्यात यावे.

| जिल्हानिहाय स्तरावर स्पर्धा आयोजन कालावधी | | |
|---|---|---|
| **क्र.** | **कालावधी** | **तपशील** |
| १ | **२९ सप्टेंबर ते ५ ऑक्टोबर, २०२६ पर्यंत** | **महाविद्यालयांनी महाविद्यालयस्तरावर वरीलप्रमाणे स्पर्धांचे आयोजन करावे, यामध्ये वरील तक्त्यातील अ.क्र. १ ते ५ कलाप्रकाराकरिता महाविद्यालयातील किमान ५ स्पर्धक सहभागी होणे आवश्यक आहे, यामधून अ.क्र. १ ते ५ कलाप्रकाराकरिता प्रथम क्रमांकाची व अ.क्र.६ करिता ८+१ अशा संघाची निवड करावी. महाविद्यालयीनस्तरावर निवड झालेल्या स्वयंसेवकांची माहिती https://forms.gle/pbj2p72FmKov8cWSA या गुगल लिंकमध्ये दिनांक ५ ऑक्टोबर, २०२६ पूर्वी कार्यक्रम अधिकाऱ्यांमार्फत भरणे अनिवार्य आहे. सदर स्पर्धकांस पुढील तपशिलानुसार जिल्हानिहाय स्पर्धेकरिता पाठवण्यात यावे. ऑनलाईन नावनोंदणी केली नसल्यास जिल्हानिहाय स्पर्धेकरिता सहभागी होता येणार नाही.** |

| जिल्हानिहाय स्पर्धा वेळापत्रक | | | |
|---|---|---|---|
| **क्र.** | **विभाग व दिनांक** | **आयोजक महाविद्यालयाचे नाव** | **स्पर्धा समन्वयक अधिकारी नाव व संपर्क** |
| १ | **पुणे ग्रामीण**<br>**१०/१०/२०२६**<br>**स. ९.०० वा.** | ए.आय.एस.एस.सोसायटीचे ए.आय.एस.एस. अभियांत्रिकी महाविद्यालय, केनेडी रोड, आर.टी.ओ. कार्यालया शेजारी, पुणे | **डॉ. नाना शेजवळ**<br>९४२२३०९१०४ |
| २ | **अहिल्यानगर**<br>**१२/१०/२०२६**<br>**स. ९.०० वा.** | अ.जी.म.वि.प्र.स., न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, लालटाकी रोड, अहिल्यानगर | **डॉ. गणेश निमसे**<br>७३८५०५३८७४ |
| ३ | **नाशिक**<br>**१२/१०/२०२६**<br>**स. ९.०० वा.** | म.वि.प्र.स.चे के.जी.डी.एम. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, निफाड, नाशिक | **प्रा.डॉ. रविंद्र आहिरे**<br>९७६५२१९४२२ |
| ४ | **पुणे शहर**<br>**१३/१०/२०२६**<br>**स. ९.०० वा.** | श्री शिवाजी मराठा सोसायटीचे समाजभूषण बाबुराव उर्फ आप्पासाहेब जेधे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शुक्रवार पेठ, पुणे | **डॉ. अमित गोगावले**<br>९९२२०७४८४७ |
| आयोजक महाविद्यालयांनी जिल्हानिहाय स्पर्धेतील प्रथम तीन क्रमांक विजेत्या स्पर्धकांना विद्यापीठस्तरीय स्पर्धेत सहभागी होण्याकरिता पुढील तपशिलानुसार पाठवण्यात यावे. | | | |
| **विद्यापीठस्तरीय स्पर्धा तपशील** | | | |
| १ | **दि. १६ ऑक्टोबर, २०२६**<br>**स. ९.०० वा.** | संत ज्ञानेश्वर सभागृह,<br>सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ | राष्ट्रीय सेवा योजना कार्यालय<br>सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ<br>०२०-२५६२२६८८,८९,९०,९१ |
| **टिप : विद्यापीठस्तरीय स्पर्धांचे विषय जिल्हास्तरीय स्पर्धेप्रमाणेच राहतील याची स्पर्धकांनी नोंद घ्यावी.** | | | |

तरी वरीलप्रमाणे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाठी सांस्कृतिक व साहित्यिक स्पर्धांमध्ये जिल्हास्तरीय व विद्यापीठस्तरावर सहभागी होण्याकरिता आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी पाठवण्यात यावेत. जिल्हा व विद्यापीठस्तरीय स्पर्धेत सहभागी स्वयंसेवक यांचा प्रवासखर्च नियमित कार्यक्रमातून करण्यात यावा. कळावे, ही विनंती.

**संचालक (अतिरिक्त कार्यभार)**
**राष्ट्रीय सेवा योजना**

*टिप :* *१. प्रत्येक कलाप्रकारात सहभागी होणे अनिवार्य नाही.*
*२. गुगल लिंकद्वारे माहिती फक्त कार्यक्रम अधिकाऱ्यांनीच भरावी. अन्यथा प्रवेशिका रद्द करण्यात येईल.*